## समर्थांची प्रमुख ठिकाणे

१) **जांब** :- (जांबुवंती) समर्थांचे जन्मस्थान, जन्म स. १६०८, १२ वर्षे वास्तव्य, ८ व्या वर्षी राम दर्शन, लग्नाचा विषय निघताच ओढ्यांत उडी, 'चिंता करतो विश्वाचीं', लग्नातून पलायन.

२) **नाशिक टाकळी** :- समर्थांचे साधनाक्षेत्र, स. १६२० ते १६३२, १२ वर्षे वास्तव्य, करुणाष्टके, स्वहस्ते रामायण लेखन, आत्मज्ञान, कुलकर्णी यांचे प्रेत उठवले, सन १६२३. शिष्य उद्धव, मठ व मारुती, एकवीस समासी दासबोध.

३) **चाफळ** :- (चंपावती) श्रीरामाची स्थापना सन १६४८, २० वर्षे वास्तव्य, हे मुख्य अधिष्ठान, लोभी ब्राह्मण उत्सवात आले नाहीत म्हणून भोरववाडी येथील अंत्यजांचा सत्कार, एका पोरक्या मुलीचे संगोपन व विवाह.

४) **शिवथरघळ** :- निसर्गरम्य ठिकाण, दासबोध जन्मस्थान, वास्तव्य स. १६४९ ते १६५९ नंतर कधीकधी, गणेशोत्सव केला, दक्षिण विजयास जाताना शिवरायास अठरा शस्त्रे अभिमंत्रून दिली स. १६७६. महाड ३० कि.मी.

५) **सज्जनगड** :- समर्थांचे महानिर्वाण स. १६८२, माघ वद्य नवमी शके १६०३, दासनवमी, वय ७२ वर्षे, समर्थ समाधी, राममंदिर, मठ, समर्थ शय्यागृह, वस्तू, पेठेतला व धाब्याचा मारुती, अंग्लाईदेवी, श्रीधरकुटी, ब्रह्मपिसा, तलाव, रामघळ .

• सर्व ठिकाणांचा प्रवास एस्.टी. ने सात दिवस खाजगी वाहनाने चार दिवस (अंदाजे ७०० कि.मी)

### ** समर्थांच्या निसर्गरम्य घळी **

१) **शिवथरघळ** :- दासबोध जन्मस्थान, जिर्णोद्धार झाला असून अनेक उपक्रम चालतात.

२) **जरंडेश्वर** :- लहानशी घळ, वास्तव्य स. १६४५ चा सुमार, वय ३६ ते ३८ वर्षे एकटेच असत, 'पिसाट रामदास', माहुली ८ कि.मी.

३) **सज्जनगड** :- खलबत खान्यासारखे लहान विवर, ध्यानाचे एकांत ठिकाण.

४) **मोरघळ** :- सज्जनगड पासून ८ कि.मी., सर्वात मोठी व गूढ गंभीर घळ.

५) **तोंडोशी घळ** :- तारळेखोऱ्यात, काशिळ २४ कि.मी., अत्यंत रम्य ठिकाण, वास्तव्य सुमारे स. १६४४ ते १६४८, वय ३६ ते ४० वर्षे, बहुधा एकटेच असत.

६) **चाफळ रामघळ** :- चाफळ ८ कि.मी., निसर्गरम्य, जांभा दगड, ३ विवरे, २ मजले, सर्वच रहश्यमय, जवळच कुबडी तीर्थ व वाघापूर सडा.

७) **चंद्रगिरीची घळ** :- फार अडचणींत, चरेगांव ३ कि.मी., समर्थांची फार आवडती घळ, वास्तव्य ३६ ते ४२ वर्षे, यावर त्यांचे एक काव्य आहे, वसंत गड २ कि.मी.

८) **हेळवाकची घळ** :- कोयनानगर १० कि.मी., दाट जंगल, रम्य निसर्ग, स. १६७४, येथे समर्थांनी चातुर्मास केला, वय ६६ वर्षे, भैरवगड ८ कि.मी.

• सर्व प्रवास एस्.टी.ने सात दिवस, खाजगी वाहन चार दिवस (अंतर ३६० कि.मी.)

(स्वतंत्र नकाशा पत्रक उपलब्ध)

### ** समर्थांचे अकरा मारुती **

सर्वांची स्थापना बहुधा स. १६४४ ते १६५० चे दरम्यान झाली. मुख्यत्वे वैयक्तिक उपासने साठी , बहुधा हाताचा चपेटा व पायाखाली राक्षस असा प्रताप मारुती.

१) **शहापूर** :- सतीबाई शहापूरकर यांचे साठी स. १६४५, उंब्रज ६ कि.मी.

२) **मसूर** :- पहिले ३-४ राम जन्मोत्सव येथेच झाले, त्याचे आधी याची स्थापना झाली असावी. उंब्रज ३ कि.मी.

३) **उंब्रज** :- समर्थ चाफळहून येथे नित्य कृष्णास्नानास येत, कधी वास्तव्य असे, स्नानोत्तर दर्शनासाठी याची स्थापना, चाफळ ८ कि.मी.

४) **चाफळ** :- रामासमोर हात जोडलेला 'दास मारुतीं'.

५) **चाफळ** :- राममंदिरा मागे, गांवाचे रक्षणासाठी, प्रताप मारुती.

६) **माजगांव** :- गांवाचे शिवेवर हा धोंडा होता, लोक त्यास मारुती मानत, समर्थांनी रीतसर त्याची मारुती म्हणून स्थापना केली, लोकांची त्यावर श्रद्धा वाढली. चाफळ २ कि.मी.

७) **शिंगणवाडी** :- छोट्या टेकडीवर सुरेख देवालय, येथे जवळच शिव-समर्थांची प्रथम भेट झाली. चाफळ १ कि.मी.

८) **बहे (बाहु क्षेत्र)** :- लंकेतून येताना येथे श्रीराम संध्या करत होते. कृष्णा भेटीस आली, मारुतीने तिला दोन्ही बाहुंनी आडविले, रामाज्ञेने सोडल्यावर तेथे बेट तयार झाले, म्हणून बाहु क्षेत्र. इस्लामपूर २४ कि.मी.

९) **बत्तीस शिराळे** :- महादजी देशपांडे व इतर भक्त यांचे साठी, जुने सुरेख देवालय, छान परिसर, जयराम गोसावी समाधी, इस्लामपूर २४ कि.मी.

१०) **पारगांव** :- स. १६७२ पन्हाळयावर असलेल्या बहलोल खानाच्या हालचालीवर लक्ष ठेवले, ती रामनवमी येथेच केली.

११) **मन पाडळे** :- येथून पारगाव ५ कि.मी., जोतिबा पन्हाळा ८ कि.मी., पायी जाता येते.

• सर्व प्रवास एस्.टी.ने तीन दिवस खाजगी वाहनाने दोन दिवस अंतर २१५ कि.मी.

(स्वतंत्र नकाशा पत्रक होत आहे.)

### ** कृष्णा काठी समर्थ तीर्थक्षेत्रे **

१) **महाबळेश्वर** :- कृष्णेचे उगमस्थान, क्षेत्र महाबळेश्वर येथे कृष्णाकाठी पहिला मठ व मारुती, दिवाकर गोसावी यांस अनुग्रह. स. १६४४, मठात समर्थ वस्तू व त्यांचे धोतर नेसलेले चित्र, स. १६५९ अफजलखान वध, समर्थांनी येथे चातुर्मास केला, स१६६६ शिवरायांनी अर्थरसीटचे जंगलात समर्थांसाठी वाघिणीचे दूध काढले.

२) **धोम** :- कृष्णा व वळकी संगमक्षेत्र, सुरेख देवालय, कथा-कीर्तन, जनसंपर्क, आता धोम धरण झाले आहे. कमळ गड व केंजळ गड ८ कि.मी.

३) **भोगाव** :- समर्थशिष्य वामनपंडीत यांची अगदी साधी समाधी.

४) **वाई** :- प्रसिद्ध तीर्थक्षेत्र, मठ, मारुती व रोकडोबा यांची स्थापना स. १६४४. पिटके, थिटे, चित्राव वगैरेंस अनुग्रह, कथा-कीर्तन, पांडवगड ८ कि.मी., मांढरदेवी ११ कि.मी.

५) **भुईंज** :- पुणे सातारा रस्त्यावर, टुमदार गाव, कण्हेरीचे वासुदेव स्वामींचा शिष्य वामन याचा मठ होता. पूर्वी भृगू ऋषींचा आश्रम होता. सातारा २० कि.मी.

६) **मर्ढे** :- 'मयरुढ क्षेत्र' कृष्णाकाठी समर्थ शिष्य वासुदेव यांचा मठ, नंतर शिष्या विदेह स्वामी असत. सातारा १२ कि.मी.

७) **माहुली** :- कृष्णा-वेण्णा संगम, मठ मारुती, कपिलाशष्ठीस स्नान, ब्राह्मणांस गोटे दक्षिणा, नंतर त्याचे सोने झाले स. १६७४. त्रिपुटी क्षेत्र ३ कि.मी.

८) **अंगापूर** :- जुने मोठे तीर्थक्षेत्र, प्रशस्त डोह, रम्य परिसर, चाफळची राम (सूर्य) मूर्ती व अंग्लाई देवीची मूर्ती या डोहांत सापडली, जवळच ब्रह्मपुरी धरण.

९) **उंब्रज** :- कृष्णा, मांड, तारळी संगम, मठ व मारुती, केशव स्वामी समाधी.

१०) **कऱ्हाड** :- कृष्णा-कोयना प्रसिद्ध संगम, बालविधवा अक्काबाई यांस अनुग्रह स. १६४५, अगाशीव कोरीव लेण्या ८ कि.मी.

११) **बहे** :- कृष्णेमधील बेटावर राम-मारुती व शिवमंदिर अतीशय रम्य परिसर, शिष्य मुरारी याचे वास्तव्य, इस्लामपूर २४ कि.मी.

१२) **ब्रह्मनाळ** :- कृष्णा व येरळा यांचा संगम, रुंद पात्र, सुरेख घाट, रम्य शांत वातावरण, अनंदमूर्ती यांची समाधी, सांगली १६ कि.मी.

(महाबळेश्वर ते ब्रह्मनाळ कृष्णाकाठाने पदभ्रमण अंदाजे २० दिवस)

### ** समर्थ पंचायतन **

**समर्थकालीन** चार प्रसिद्ध संत व समर्थ मिळून पाच. समर्थ सर्वात वयाने व सामर्थ्याने श्रेष्ठ असल्याने त्यांस फार मान असे.

१) **वडगांवचे जयराम स्वामी** :- गृहस्थाश्रमी, थोर कृष्ण भक्त, उत्तम कवी व कीर्तनकार, समाधी स. १६७२. रहिमतपूर १६ कि.मी.

२) **निगडीचे रंगनाथ स्वामी** :- ब्रह्मचारी, ठसठसीत मर्मभेदक व्यक्तीमत्व, धाडसी राजयोगी, झिडकारले तरी वैभव मागे लागे, समाधी स. १६८४. सातारा २० कि.मी.

३) **ब्रह्मनाळचे आनंदीमुर्ती** :- गृहस्ताश्रमी, योगी भक्त, तीव्र गुरु भक्तिने रामनवमी उत्सवात गुरुंचे वृंदावन डोले. समाधी स. १६६६.

४) **भागानगरचे केशवस्वामी** :- गृहस्थाश्रमी, कृष्ण भक्त, उत्तम कवी व कीर्तनकार, कीर्तनात देव त्यांचे गळयात हार घाले. समाधी स. १६८२. हैदराबाद ८ कि.मी.

### ** शिवदूर्ग व समर्थ **

१) **प्रतापगड** :- स. १६५७, गडप्रवेश समारंभास सर्वप्रथम आमंत्रण समर्थांस, बालेकिल्ल्याच्या दरवाज्याजवळ समर्थस्थापित शेवटचा मारुती. स. १६७८ समर्थांनी देवीचा नवस फेडला, देवीने मोत्यांचा हार त्याच्या गळयात घातला. मकरंद गड २४ कि.मी.

२) **रायगड** :- (उंची ९४३ मी.) शिवरायांची प्रसिद्ध राजधानी, येथे समर्थांचा मठ होता. शिवथरघळ पायी २४ कि.मी. महाड २४ कि.मी.

३) **विशाळगड** :- स. १६७२ बहलोल खानाचा शिवरायांवर आक्रमण करण्याचा बेत, ११ कि.मी., पारगाव येथे राहून परिस्थिती अवलोकन.

४) **पहिपतगड** :- (उंची १००० मी.) शिवरायांने समर्थांस हा व परळीगड सुचविला. विचारांती समर्थांनी परळी उर्फ सज्जनगड पसंत केला. सुमारगड ५ कि.मी., रसाळगड १० कि.मी.

५) **सज्जनगड** :- (उंची १००० मी.) समर्थांचे शेवटचे ६ वर्षे वास्तव्य, स. १६५१ शहाजीराजांची भेट, मोठा संत मेळावा भरवला, शिवरायांचे १ महिना वास्तव्य व समर्थांसमोर कीर्तन. सातारा १४ कि.मी.

६) **सामानगड** :- (उंची ८६६ मी.) स. १६७७, दगड फोडून आत जिवंत बेडकी दाखविली, शिवरायांचे गर्वहरण, 'आम्ही काय कुणाचे खातों' व इमारती प्रकरण रचना. गडहिंग्लज १० कि.मी.

७) **वासोटा (व्याघ्रगड)** :- (उंची ११६६ मी.) स. १७०० ते १७०९ औरंगजेबाचे आक्रमणत सज्जनगडच्या राममुर्ती येथे ठेवल्या होत्या, ट्रेकर्स लोकांचा प्रियगड.

### ** समुद्र किनारी समर्थ ठिकाणे **

१) **दंडाराजापुरी** :- येथे ज्ञानी व विरक्त, त्रिंबक हा शिष्य राहून जगदोद्धार करीत असे. येथून जंजीराच्या सिद्दीच्या हालचाली समजत असत.

२) **देवगड** :- दामोदर हा एकांतप्रिय शिष्य गुरुभजनात तत्पर असून संप्रदाय चालवी.

### ** कोकणात समर्थ ठिकाणे **

१) **चिपळूण** :- राष्ट्रजागृतीसाठी परशुरामास कळकळीची विनंती करणारे काव्य, परशुरामक्षेत्र, रम्य निसर्ग, अस्सल कोकण बघावयास मिळते.

२) **पोलादपूर** :- (पौलस्यनगर) समर्थमठ, स. १६७३ शिवराय पन्हाळयास जाताना वाटेत समर्थांची भेट.

३) **बिरवाडी** :- शिवरायांचे तळहातावर गळू, स्वप्न दृष्टांत व नंतर भेट स. १६७५, रायगड पायी १६ कि.मी., जवळच एम्.आय्.डी.सी. ची मोठी औद्योगिक वसाहत.

४) **रामदास पठार** :- समर्थवास्तव्याचे एक ठिकाण, शिवथरघळ ६ कि.मी.

### ** इस्लामी सुभेदारांचे गर्वहरण **

१) **माहुली** :- उद्धवाचा छळ, ठाणेदारास छडीने मारले, धनुष्यबाणाची करामत, सुभेदार शरण.

२) **मिरज** :- जयरामस्वामींची सत्वपरीक्षा, समर्थ सूक्ष्मरुपाने किल्ल्याचे जंगीतून बाहेर पडले, किल्लेदाराचे गर्वहरण, वेणाबाईंचा मठ स. १६५५.

३) **इंदूरबोधन** :- ब्रह्मणांची सत्वपरीक्षा, समर्थकृपेने पाऊस पडला, यवन सरदाराचे सर्वहरण, उद्धवांचा मठ स. १६५३.

### ** इतर गोष्टी **

१) **लवथळेश्वर** :- जुने शिवालय, येथे झोपल्यास लोक मरत, समर्थ मेले नाहीत, गावकऱ्यांस आश्चर्य, 'लवथवती विक्राळा', आरती येथे रचली, जेजुरी ५ कि.मी.

२) **शमनामिर पीर** :- समर्थ दर्शनास गेले असता घसरून पाय दुखावला, पीराने तो बरा केला, दोघे एकमेकांस मानत.

३) **पंढरपूर** :- स. १६४९ , समर्थ दर्शनास गेले, देशाची स्थिती पाहून म्हणाले 'इथे का रे उभा श्रीरामा', विठ्ठलाने रामरुपात दर्शन दिले.

४) **माहुर (मातपूर)** :- स. १६५२, दत्त दर्शनासाठी ब्राह्मणांचे अनुष्ठान, समर्थ तेथे आले, समर्थ व ब्राह्मण यांची सत्व परीक्षा, ब्राह्मण पळाले, समर्थांस व मग ब्राह्मणांस दत्त दर्शन.

५) **सातारा** :- स. १६५५, शिवराय भिक्षेत राज्य घालतात, 'सावधानता' समास निरुपण.

६) **पाटण** :- स. १६५६, समर्थ कोयना पुरात बुडाले, चांदजीरावाने जागा दाखविली, कल्याणाने त्यांस वर काढले, चांदजीरावांस अनुग्रह.

७) **देहेगाव** :- समर्थ शिष्यांनी हुरडा केला, शेताचा मालक चिलाजी जाधव याने समर्थांस काठीने मारले, शिवरायांस क्रोध आला, स्वतःची परिक्षा झाल्याने समर्थांनी शिवरायांकरवी त्याचा सत्कार केला, सातारा ८ कि.मी.

८) **खंडोबाची पाली** :- स. १६६६, जत्रेत ताशेवाले व हरदास यांचा झगडा, अचानक डफगाणे रचून त्यांचे गर्वहरण केले. 'किती पृथ्वीचे वजन।......

### ** इतर ठिकाणे **

१) **कोल्हापूर** :- स. १६४५, अंबाजी उर्फ कल्याण व समर्थ यांची प्रथम भेट, कोल्हापूर समर्थांस फार आवडे, त्यावर त्यांचे एक काव्य आहे.

२) **परळी** :- शिवरायाने समर्थांस संध्या मठ बांधून दिला, शिवरायांस 'बाग प्रकरण' सांगितले.

३) **वृद्धेश्वर** :- नाथसंप्रदायाचे निसर्गरम्य तीर्थक्षेत्र, दिनकर पाठक यांची गुरुप्राप्ती साठी साधना, समर्थांनी त्यास अनुग्रह दिला. स. १६५३. अहमदनगर ४८ कि.मी.

४) **जेजुरी** :- स. १६६३, समर्थ दर्शनास गेले असता 'पंचानन हयवाहन' आरती रचली.

५) **शिरगाव** :- कल्याणांचे धाकटे बंधू दत्तात्रय यांचा मठ व समाधी.

६) **कण्हेरी** :- सदाशिव शास्त्री येवलेकर उर्फ 'वासूदेव' यांचा मठ व समाधी, स. १६९२, त्यांस समर्थ प्रतिमा म्हणत.

७) **पसरणी** :- समर्थशिष्य वासुदेव यांचा मठ. वैशिष्ट्य म्हणजे रामासमवेत सीतेने पण धनुष्य घेतले आहे.

८) **धुळे** :- स. भ. शंकर श्रीकृष्ण देव यांनी समर्थ वागदेवता मंदिर येथे समर्थ वाङ्मयाच्या हस्तलिखीतांचा मोठा संग्रह जमा, जतन व संशोधन करुन ठेवला आहे.

# समर्थांची स्मृतिस्थाने

**

**मनोहर गांगल**
नारायण पाखाडी श्रीवर्धन,
जि. रायगड पिन. ४०२११०